# प्रकरण चौथे

## कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये

# प्रकरण चौथे

# कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या लेखनशैलीची वैशिष्टये

## प्रस्तावना

भाषा हे मानवी जीवनाचे प्रमुख अंग आहे. भाषा संदेशवहन करते. भाषेतून भावना व्यक्त होतात. भाषा हे संस्कृतीचे वाहन असते. आपले विचार, कल्पना या दुसऱ्या व्यक्तीला सहजपणे समजतील व पटतील अशा पध्दतीने सांगणे यास साहित्यात महत्व आहे. यासाठी भावाभिव्यक्ती योग्य रितीने व्यक्त होतील अशा अचूक शब्दांची निवड लेखकाला करावी लागते. प्रत्येक व्यक्तीच्या वयानुरुप, ध्येयानुरुप व कालानुरुप भाषेचे स्वरुप बदललेले, वेगवेगळे असलेले दिसून येते. भाषा ही जशी वैयक्तिक असते, तशीच ती सामाजिकही असते. तिचा उपयोग समाजाला अनुसरुन पण विशिष्ट रीतीने प्रत्येक व्यक्ती करीत असते. भाषा ही अर्थवाही व सूचक पाहिजे. तिला थोडक्यात मोठा आशय व्यक्त करता आला पाहिजे. पात्र व प्रसंग डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य तीत असणे गरजेचे आहे. असे सामर्थ्य म. भा. भोसले यांच्या लेखनशैलीत आहे. प्रस्तुत प्रकरणात म. भा. भोसले यांच्या लेखनशैली वैशिष्ट्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

म. भा. भोसलेंच्या लेखनशैली वैशिष्ट्याचा हा अभ्यास ‘ समरांगण ’ व ‘ उघड्या जगात ’ या दोन कादंबऱ्यांच्या अनुषंगाने करावयाचा आहे. यासाठी सर्वात प्रथम कादंबरी लेखनात जी निवेदन पध्दती महत्वाची असते. त्या निवेदनपध्दतीचा विचार प्रथम करु.

## ‘ कादंबरी ’ ची निवेदन पध्दती

कादंबरी निवेदन प्रधान कथात्म असा वाङमय प्रकार आहे. जीवनाच्या विविध अंगांना तो स्पर्श करतो. कादंबरीला आकार देणाऱ्या व्यक्तिरेखा, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्या कृती, कादंबरीतील घटना, प्रसंग या सर्वांची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हे साधन असते. वर्णन, संवाद अशा घटकांनी कादंबरीची भाषा तयार होते. ग्रामीण

कादंबरीतील निवेदन पध्दती ही एक कसोटी मानली जाते. कारण ग्रामीण कादंबरीचे निवेदन वैशिष्ट्यपूर्ण असते.

आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याच्या भाषेचा विचार मांडताना असे म्हंटले आहे की," प्रत्येक कलात्मक अनुभव अनन्य साधारण जसा असतो तसा त्याचा स्वभावही अनन्य साधारण असतो. त्याच्या स्वभावाच्या या अनन्य साधारणावरच भाषेची अभिव्यक्ती अवलंबून असते. "[१] म्हणजे भाषेकडे पाहताना लेखकाच्या अनुभवाला आणि त्या अनुभव घेण्याच्या अनन्यसाधाणात्वाला महत्व असून त्याचा अनुभव घेण्याच्या पध्दतीतच त्याच्या भाषाभिव्यक्तीची श्रेणी दडलेली असते. जसा अनुभव तशी भाषा. तसेच कादंबरीकाराचे व्यक्तिमत्त्वही महत्वाचे असे म्हणता येईल.

ग्रामीण जाणीव संवेदनाच्या पातळीवर जेंव्हा भाषेतून जन्मते तेंव्हा तिच्यामध्ये आविष्करशीलता येते आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव तटस्थपणे जेंव्हा प्रकट होतो तेंव्हा त्याला निवेदनशीलतेचे स्वरुप येते. हे आनंद यादव यांचे मत यथायोग्य आहे असे म्हंटल्यास वावगे ठरु नये.

कथात्मक साहित्याचे आकलन व मूल्यमापन निवेदन पध्दतीच्या सूक्ष्म अभ्यासाने अधिक डोळसपणे करता येते. यासाठी निवेदनपध्दती विषयी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागते. ती म्हणजे प्रथम पुरुषी निवेदन. त्रयस्थ/तृतीय पुरुषी निवेदन, संवादात्मक, संज्ञाप्रवाहात्मक अशी कोणत्याही प्रकारची निवेदनपध्दती असो तिचा एकच उद्देश असतो तो म्हणजे कथात्मक आशयाची यथार्थ अभिव्यक्ती करणे.

प्रथमपुरुषी निवेदनपध्दती मध्ये कादंबरीमध्ये ' मी ' नावाची व्यक्ती निवेदन करीत असते. उदा. ' पण लक्षात कोण घेतो ' : ' यमू ' स्त्री पात्राद्वारे केलेले निवेदन किंवा ' कोसला ' : ' पांडुरंग सांगवीकर ' या पुरुष पात्राने केलेले निवेदन हे प्रथम पुरुषी निवेदन होय. याचप्रमाणे ' बनगरवाडी ' : ' व्यंकटेश माडगूळकर ' 'गोतावळा ' (आनंद यादव), ' पड रे पाण्या ' (र. वा. दिघे), ' पाचोळा ' (रा. रा. बोराडे), ' रैत ' (महादेव मोरे) या

कादंबऱ्यांचाही प्रथम पुरुषी निवेदन पध्दतीने लिहिलेल्या कादंबऱ्यात करता येईल. आत्मनिष्ठ वृत्तीच्या लेखकांना प्रथम पुरुषी निवेदन योग्य ठरते.

तृतीय (त्रयस्थ) पुरुषी निवेदन पध्दतीमध्ये लेखक तटस्थ, सर्वसाक्षी अशा भूमिकेतून कथात्मक आशय सांगत असतो. कादंबरीतील वातावरण, कथावस्तू, पात्रे, प्रसंग या सर्वांचे नियंत्रण सूत्रधाराप्रमाणेच लेखकाच्या हाती असते.

या निवेदनपध्दतीचे शितु (गो. नी. दांडकेर), टारफुला (शंकर पाटील), चित्रा (आण्णाभाऊ साठे), समिधा (रणजित देसाई) या कादंबऱ्या उत्कृष्ट नमुने होत.

कथात्मक साहित्यातील आशयद्रव्य ज्या भाषिक अंगाने सांगितले जाते त्याला निवेदन पध्दती म्हंटले जाते. निवेदन पध्दतीचा अभ्यास करताना मराठी ग्रामीण कादंबरीने प्रामुख्याने प्रथम पुरुष आणि तृतीय पुरुषी निवेदन पध्दती अशा निवेदनपध्दतीचा अवलंब केल्याचे दिसून येते. क्वचित अपवाद म्हणून संज्ञा प्रवाही निवेदन पध्दतीचा वापर झालेला आहे. म. भा. भोसले यांनी लिहिलेल्या ' उघड्या जगात ' कादंबरीमध्ये तृतीय पुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केल्याचे दिसते. तर त्यांनी ' समरांगण ' कादंबरीत पात्रमुखी प्रथम पुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला आहे.

' समरागंण ' या कादंबरीच्या प्रस्तावनेत या कादंबरी लेखनाबाबतीत भा. वि. वरेरकर आपले मत व्यक्त करताना सांगतात. " म. भा. भोसले यांनी ज्या पध्दतीने ही कादंबरी लिहिली आहे त्या पध्दतीच्या बाबतीत मतभेद होण्याचा संभव आहे. काव्यांत जसे चित्रबंध-मालाबंधादि प्रकार आपल्या कौशल्याच्या प्रस्थापनेसाठी कवि उपयोजितो त्याचप्रमाणे प्रस्तुत कादंबरीत उपयोजिलेला प्रत्येक पात्राच्या भिन्न आत्मनिवेदनाचा प्रकार लेखन कौशल्याची प्रतिष्ठा दाखविण्यासाठी अंमलात आणला आहे असे वाटते. कादंबरी लेखनाचे दोनच मार्ग ग्राह्य ठरतात. एक आत्मवृत्तात्मक - एकाच व्यक्तीच्या आत्मवृत्तात्मक आणि दुसरा वर्णनात्मक - आत्मवृत्तात्मक कादंबरीत कथानकाच्या व्यापक स्वरुपाला बंधन पडते. एकाच व्यक्तीचा दृष्टीकोन आणि त्या दृष्टीकोनात येऊ शकणारा कथानकांतील प्रांत याच्या पलिकडे लेखकाला

जाता येत नाही. मराठी भाषेच्या अग्रस्थानी असलेल्या कादंबरीकारांनी सुध्दा या प्रकारचा क्वचितच उपयोग केला आहे. वर्णनात्मक कादंबरी लिहिणे कथानकाच्या परिपोषाच्या दृष्टीने सुलभ असल्यामुळे बहुतांशी त्या पध्दतीचा अवलंब आजच्या बऱ्याच कादंबरीकारांनी केलेला आहे. ' समरांगण ' कादंबरीत एकापेक्षा जास्त व्यक्तींची आत्मवृत्ते मिळून जे लेखन कौशल्य प्रकट झाले आहे. त्यामुळे कादंबरीला वर्णनात्मक कादंबरीचे स्वरुप आले असून आत्मवृत्तात्मक कादंबरीच्या सहृदयतेची त्यात उणीव भासू लागली आहे. त्यापेक्षा ही कादंबरी वर्णनात्मक लिहिली असती तर जास्त आकर्षक झाली असती.'' [२]

वरील मतानुसार समरांगणामध्ये भोसले यांनी एकेका पात्राशी, व्यक्तीशी समरस होऊन जे कौशल्य प्रकट केले आहे ते ' उघड्या जगात ' या कादंबरीत नाही. या कादंबरीत सर्व पात्रांच्या स्वभावाचे त्यांच्यात घडणाऱ्या संभाषणाचे, घटनांचे त्याला ज्ञान असते. पात्रांच्या मनात प्रवेश करुन त्यांचे विचार ते मांडू लागतात. मानवी स्वभावाची गुंतागुंत, मानवी मनाची अतर्क्यता हे म. भा. भोसले यांनी तृतीय पुरुषी निवेदनपध्दतीद्वारे प्रकट केले आहे. यामध्ये लेखक कधी तटस्थ, तर कधी आपल्या पात्राविषयी सहानुभूती प्रकट करताना दिसतात.

समरांगणमध्ये निवेदनासाठी वापरलेली भाषा अत्यंत ओघवती, काव्यमय आणि सहजसुंदर असल्यामुळे कादंबरीच्या आकर्षणात अधिकच भर पडली आहे. याचबरोबर या कादंबरीमध्ये मधून मधून पत्रांचा वापर करुन कथानक सांगितलेले दिसते. कादंबरीच्या कथात्मक आशयाला उठाव मिळण्यासाठी मधून मधून सुभाषितांची पखरण ही केली आहे. यातील पात्रांचे स्वभावचित्र त्यांच्या स्वत:च्याच शब्दाद्वारे दिग्दर्शित केलेले आहे.

म. भा. भोसले यांच्या ' उघड्या जगात ' या कादंबरीतील भाषा सुबोध, प्रसंगानुरुप व प्रसादपूर्ण अनेक रसालंकारानी सजलेली दिसते. तरी निवेदनासाठी लेखकांनी ग्रामीण व नागरी भाषेचा समिश्र वापर केलेला आहे. हा सर्व आशय तृतीय पुरुषी निवेदन तंत्राने सांगितला आहे.

## कादंबरीतील भाषा

म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' आणि ' उघड्या जगात ' या कादंबऱ्यांची निवेदन पध्दती पाहिल्यानंतर सर्वप्रथम लक्षात एक गोष्ट येते आणि ती म्हणजे कादंबऱ्यात ठाई ठाई आढळणारी अलंकृत भाषा. अलंकाराने भाषेचे सौंदर्य वाढते. पण काही वेळा अलंकराच्या अतिरेक वापराने अर्थग्रहणाला अडथळा निर्माण होतो. अर्थहानी होते. मूळ कथानक, आशय, प्रसंगातील गांभीर्य या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊन वाचक केवळ भाषेच्या चमत्कृतीपूर्ण रचनेच्याच मोहात पडतो. फडके -खांडेकरांच्या कादंबऱ्यातून अशा अलंकारिक भाषेचे नमुनेच नमुने पहायला सापडतात. म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' आणि ' उघड्या जगात ' या कादंबऱ्यातूनही हे पाहायला मिळते. म. भा. भोसलेंच्या लेखनावर त्यांच्या समकालीन लोकप्रिय कादंबरीकारांचा किती प्रभाव होता. याचा जणू तो पुरावाच आहे असे वाटते. उदा.

- तारुण्य म्हणजे काय वारं आहे नुसतं, अगदी सोसाट्याचं ! अन् कामगारांचा संप, शेतकऱ्यांची चळवळ हा सांसर्गिक रोग आहे. रोगाचं वाऱ्याशी सहकार्य झाल्यावर मग त्याचा प्रसार व्हायला काय उशीर ? (समरांगण पृ. ११)
- बायकांची अब्रू म्हणजे काचेच्या भांड्यासारखी असते. जरा तडकलं, की संपला कारभार ! (समरांगण पृ. २१)
- श्रीमंताचा राग हा ज्वालामुखी आहे. अन् हा ज्वालामुखी काय करील त्याचा नेम आहे का ? (समरांगण पृ. ४५)
- स्वप्न म्हणजे काय हिऱ्यामोत्याचे दागिने नव्हेत ! कपाट उघडून हवा तो दागिना घेता येतो. (समरांगण पृ. ५२)
- जीवन हे इंद्रधनुष्यासारखे आहे. त्यांचे जे सात रंग दिसतात त्यांची शोभा तेवढी बघून घ्यावी. पण त्यातला एक रंग काही हाताला लागायचा नाही.
  (समरागंण पृ. ८१)
- गुलाबाच्या मोहक वासापुढे त्याचा फिक्कट रंग किंवा त्याचे कांटे बोचून निघालेलं रक्त देखील माणसाच्या डोळ्याला दिसत नाही ! (उघड्या जगात पृ. १५)

* सृष्टी हा एक माणसाच्या मनाचा आरसा आहे. आरशांत माणसाचं असेल तसं रूप दिसतं तर सृष्टीत त्याच्या मनाचं जसं असेल तसं प्रतिबिंब दिसतं ! तो दु:खी असला तर पानाफुलांनी बहरलेली सृष्टी देखील त्याला भयाण, रुक्ष वाटेल. अन् आनंदी असला तर मग संध्याकाळचा नयनरम्य देखावाच कशाला हवा ? उन्हाळ्यातल्या भर दुपारी त्याच्या तोंडून उद्गार निघतील, " अहाहा ! काय गोड उष्मा पसरलाय सगळ्या जगावर !" (उघड्या जगात पृ. ११०)
* मनांतले विचार म्हणजे इंदधनुष्याचे रंग ! स्पष्ट दिसले तरी हाताला मात्र एकही लागायचा नाही ! (उघड्या जगात पृ. १३२)
* मन हे सोसाट्याच्या वाऱ्यासारखं असतं. ते एकदा धावू लागलं, की त्याला अडविणं कठीणच ! (उघड्या जगात पृ. १३२)

वरील सर्व उदाहरणांमध्ये - तारूण्य म्हणजे काय ? बायकांची अब्रू कशी असते ? स्वप्न म्हणजे काय ? मोहक सुगंधाचे मर्म. माणसांचे मन इत्यादी नित्याच्या गोष्टींचे उद्बोधक चिंतन मांडले आहे आणि त्यामध्ये बोधपरता आहे. सुभाषितांचे वळण, त्यांचा प्रभाव आणि सत्य, शिव, सौंदर्य या मूल्यांविषयी असणाऱ्या प्रेमातून त्यांची केलेली भलावण ही उपदेशवजा आहे. कादंबरी सारख्या बहुआयामी वाङ्मय प्रकाराची भाषा हे तिचे सामर्थ्य असते. ती कथावस्तू, व्यक्तिरेखा आणि वातावरण यांचा एकजिनशी अविष्कार असते. अशावेळी ती सुसंगत नसेल आणि मधूनमधून त्यातून बोधपरता अवतरत असेल तर उभा केलेला प्रसंग, घटना ही कृत्रिम वाटू लागते. म. भा. भोसलेंच्या भाषा शैलीचा विचार करता समकालीन वाङ्मय परंपरेच्या अनुकरणातून विशेषत: फडके - खांडेकरांच्या भाषाशैलीच्या प्रभावामुळे त्यांच्या भाषाशैलीमध्ये अलंकारिकता आली आहे. म्हणून ती काही ठिकाणी कृत्रिम वाटू लागते.

## निवेदनातील बोधप्रधानता

एक साहित्यकृती म्हणून तटस्थपणे ' समरांगण ' आणि ' उघड्या जगात ' या दोनही कादंबऱ्यांकडे पाहिले तर दोनही कादंबऱ्यामध्ये ' बोधप्रधानता ' आढळते. म. भा. भोसले

हे शिक्षक होते. ' जे आपणासी ठावे ते दुसऱ्याशी सांगावे ' या वचनाप्रमाणे त्यांनी ग्रामीण वाचकांना आपले अनुभव आणि त्याचे चिंतन बोधामृत पाजावे त्याप्रमाणे मांडले आहे. ते लिहित होते त्याकाळी त्यांच्या वाचनात जे साहित्य येत होते. त्यात ही बोधप्रधानता प्रभावी होती. वाचकांना उपदेश करावा, त्यांना हिताच्या गोष्टी सांगाव्यात हे जणू साहित्याचे कार्य आहे व ते एखाद्या सामाजिक प्रश्नाच्या माध्यमातून सांगावे असे त्यांच्या मनावर ठसणे गैर नव्हते.

म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' आणि ' उघड्या जगात ' या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण शेतकरी जीवनातील सामाजिक, आर्थिक संघर्षाच्या गाभा आहेत. ते कृषिविषयक प्रश्न आहेत. मात्र हे प्रश्न मांडताना त्यांनी रंजनपरता स्वीकारली. कादंबरी रंजक असली पाहिजे. ती वाचकाने अखेरपर्यंत वाचली पाहिजे. तसेच कादंबरीतून काही एक जीवन विषयक बोध त्याला झाला पाहिजे हा दृष्टिकोन त्यांनी बाळगला होता. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यातून बोध प्रकट झाला आहे. उदाहरणार्थ -

* थोड्याशा आंचेनं पाणी ऊतूं येतं अन् सांडतं. पण आग जास्त झाली तर तेच पाणी आटून जातं. (समरांगण पृ. २१)
* शिक्षण हे अमृत आहे. ते स्वतः जगून दुसऱ्यालाही जगवितं !
  (समरांगण पृ. ३२)
* एकाचा बळी जाऊन शंभर सुखी होणं हे वाईट नाही ! पण, त्या एका बरोबर शंभरांनी बळी जावं लागणं फार वाईट आहे ! (समरांगण पृ. ३५)
* खादी वापरणं हे वेड नाही, बापू. तो एक देशाभिमान आहे. आपल्या देशात होणारंच कापड वापरण्यात केवढा तरी आनंद आहे. (समरांगण पृ. ६४)
* सुखाचं जीवन ज्याला हवं असेल त्यानं अन्यायाकडे डोळे झाकूनच पाहिलं पाहिजे. सुख कधी भीक मागून मिळत नाही. ते कर्तबगारीन मिळवावं लागतं. पण ते शक्य नसल्यास ते मिळविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अन्याय ! औरंगजेबानं ते राज्यपदाचं

सुख मिळविलं ते न्याय अन्यायाचा जप करीत नाही तर स्वत:च्या बापाला तुरुंगात टाकून ! (समरांगण पृ. ८२)

* दया हे एक झाड आहे. त्याची निपज प्रत्येक हृदयांत असते. जरुर तेवढं पाणी मिळाल्यास त्याची जोमात वाढ होते. फळाफुलांचा त्याला बहर येतो. अन् कुणी अपेक्षा न करतांही ते दुसऱ्याची भूक नाहीशी करतं. मधुर वासानं त्याला गुंगवतं आणि गार सावलीला त्याला स्वर्ग सुख देतं. पण ते झाड करपलं तर ? त्याच्याकडे याचना करुनही काही उपयोग नाही. झाडं का करपतात ? पाणी न मिळाल्यामुळे हे उघड आहे. पण फार पाण्यामुळेही झाडं कुजून जातात. (समरांगण पृ. २७)

* पापी माणसाच्या मनात साशंकता रुजते हे खरं. पण ज्यांना पाप पचविण्याची शक्यता असते, त्यांच्या मनात तसल्या साशंकतेचा लवलेशही नसतो. उलट त्यांच्या ठिकाणी एक प्रकारचा उर्मट गाफीलपणाच निर्माण झालेला असतो. (उघड्या जगात पृ. २२)

* धोंड्यावर कपाळ आपटून धोंडा काही फुटत नाही. उलट कपाळालाच खोक पडते. (उघड्या जगात पृ. २३)

* निराशेतून आशेचा उदय नी पराभवांतून यशाची खात्री सुदैवानं कित्येकांना प्राप्त होते, पण असे फार थोडे असतात. बहुतेकांच्या जीवनात निराशा ही खोल दरी ठरते. (उघड्या जगात पृ. १३४)

* या गोष्टीत अपयश आलं ती सोडून देणं हे मर्दाचं लक्षण नव्हे. यश मिळेपर्यंत झटायचं सोडून तू निराश झालास तर तुला सगळ्या आयुष्यात आशेचा एक किरण सुध्दा दिसायचा नाही. आयुष्य म्हणजे आशा निराशेचा खेळ असतो. खेळांत डाव आला म्हणून आपण रडत बसत नाही, तर तो घालविण्याचा प्रयत्न करतो. आयुष्यात देखील तसंच वागायला हवं. (उघड्या जगात पृ. १३५)

* काळ्या खडकावरच्या नितळ पाण्यालाच जग भुलतं अन् त्यांत उडी घेऊन कपाळ फुटलं म्हणजे रडत बसतं. मोकाट जमिनीवरच्या गढूळ पाण्याला ते सतत नाक

मुरडतं, त्याला स्पर्शसुध्दा करीत नाही. पण जगानं पवित्र मानलेल्या कमळाचा जन्म त्यातच होत नाही का ? (उघड्या जगात पृ. १६६)

अलंकारिक भाषाशैली, बोधप्रधानता हे म. भा. भोसले यांच्या कादंबरी लेखनातील विशेष तपासताना, त्यांच्या लेखनात जागोजाग सुभाषितांचा आढळ होतो. त्यामुळे ती भाषा सांकेतिकतेच्या आहारी गेल्याचे दिसते. सामान्य वाचकांना अशा भाषा शैलीची आणि सुभाषितवजा वाक्यांची आवड असते. वाचनात अशा भाषाशैलीची आणि सुभाषितवजा वाक्यांची आवड असते. वाचनात गोडी निर्माण करण्यासाठी ही सुभाषितं योग्य वाटत असली तरी कृतक खोट्या, नकली भाषेच्या पेहराव्यातून व कल्पनाचमत्कृतीमुळे कथावस्तूचे गांभीर्य ती हिरावून घेतात. उदाहरणार्थ -

* स्वत: जगण्यापेक्षा दुसऱ्याला जगविण्यातच माणुसकी आहे. (समरांगण पृ. २२)
* देव माणसाकडून सेवा घेतो. पण माणूस माणसांची सेवा करतो. (समरांगण पृ.४१)
* तत्वं ही शोभेसाठी नसतात. त्याप्रमाणे वागण्यांत माणुसकी आहे. (समरागंण पृ.९५)
* पैसा हे या जगातलं विष आहे. विषानं माणसं मरतात. पैशानं माणुसकी नष्ट होते. (उघड्या जगात पृ. ५६)

ही सुभाषितप्रधान भाषा वाचताना बरी वाटते. एकंदरीत पाहता म. भा. भोसले यांच्या दोन्ही कादंबऱ्यातील भाषा अनेक रसालंकारांनी, बोधपर वाक्यानी व सुभाषित वजा कोटीने नटलेली असल्याने त्यांच्या कादंबऱ्या वाचकप्रिय ठरल्या आहेत.

## ' समरांगण ' व ' उघड्या जगात ' या कादंबरीतील कृषिसंस्कृतीचे भाषाविश्व

कादंबरीकार म. भा. भोसले यांची अलंकारिक भाषा शैली त्यांच्या कादंबरीची निवेदन पध्दती व सुभाषित, म्हणी, वाक्प्रचार इत्यादींनी त्यांनी सादलेली भाषेची सजावट पाहिल्यानंतर त्यांच्या ' समरांगण ' आणि ' उघड्या जगात ' या दोन कादंबऱ्यातून भावणारे ग्रामीण म्हणजेच कृषिसंस्कृतीचे भाषाविश्व कसे आकारले आहे. ते तपासून पाहण्याचा प्रयत्न पुढील विवेचनात केला आहे.

खरा भारत खेड्यात आहे. या महात्मा गांधीच्या वचनामध्ये खरी भारतीय संस्कृती खेड्यात आहे. ह्या व्यापक संदेश दडला आहे. भारतीय खेड्यांची संस्कृती ही कृषि परंपरेतून आकारास आलेली संस्कृती असून खेड्यांचा प्रत्येक सांस्कृतिक व्यवहार कृषिकर्माशी निगडीत असलेला दिसतो. मुळात ' शेती ' ह्याच कृषिसंस्कृतीचा मूळ उगम आहे. यातून कृषिसंस्कृती बहरास आली.

कृषिसंस्कृतीचा केंद्रबिंदू असलेल्या शेतीचा अनेक नैसर्गिक घटकांशी संबंध असतो. मग ऊन, वारा, पाऊस, जमीन, नदी या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा परिणाम हा शेतीवर व शेतीशी निगडीत लोकजीवनावर होत असतो. म. भा. भोसले यांनी अशा कृषिसंबंधित निसर्ग घटकांचे निसर्गातील वातावरणाचे समृध्द वर्णन आपल्या लेखणीद्वारे घडवलेले आहे.

निसर्गामध्ये होणाऱ्या अचानक बदलामुळे वातावरणामध्ये कसा बदल होतो याची जाणीव म. भा. भोसले यांच्या भाषाशैलीने उभी केली आहे. ते लिहितात -

" एकदम जोराचा वारा सुरु झाला. त्याच्याबरोबर धुळीचे लोट उठले. पालापाचोळा भिंगरीसारखा आकाशात फिरु लागला. झाडाझुडपाच्या फांद्या करकर आवाज करीत हेलकावे खाऊ लागल्या. गंजीवरच्या मोकळ्या पेंढ्या पाखरांगत उडून खाली आल्या. गुरांचा मांडव तर इतके हेलकावे घेऊ लागला, की त्यानं गुरं भयभीत झाली. थोडयाच वेळात पावसाचे टपोरे थेंब पडू लागले आणि त्यांच्याबरोबर सुपारीएवढ्या पांढऱ्या सफेत गारा मांडवावर व घराच्या छपरावर टपटप पडू लागल्या. (उघड्या जगात पृ. १८०)

वरील उताऱ्यातून पावसाचे हुबेहूब वर्णन आणि त्याच्या आगमनाने वातावरणात ग्रामीण जीवनात झालेला बदल याचे हुबेहूब चित्र म. भा. भोसले यांच्या भाषेतून होताना दिसते.

उन्हाळी पावसाच्या शिडकाव्याने रम्य बनलेल्या नदीकाठच्या मळईच्या रानाचे वर्णनही असेच बहारदार आलेले आहे.

" एक उन्हाळी पाऊस झाला असल्यामुळे सगळी जमीन मोकार दिसत होती आणि तिच्यावर ठिकठिकाणी खेळत असलेली हिरवळ पाहून बरं वाटत होते. उजव्या बाजूचा

देखावा तर फारच रम्य दिसत होता. मळीची तांबडी भडक जमीन, तीत फोंफावून वाढयारी गवतं नि शेवऱ्या हिरव्यागार दिसत होत्या. त्यापलीकडे वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा तो तांबूस रंग किती बहारीचा वाटला. नदीच्या राड पाण्यात न्हाल्यामुळे मळीतल्या सगळ्या झाडांच्या पानांवर तांबड्या मातीचे कण चिकटले होते. अन् ठिकठिकाणच्या खोलवटयांत पाणी तसंच साचून राहिलं होतं, ते सुर्याच्या कोवळ्या किरणांत चमकत होतं. रस्त्यावर दुतर्फा लिंबाची अन् करंजीची झाडं वाढली होती. आणि करंजीच्या पांढऱ्या शुभ्र फुलांचा तर रस्त्यावर सडाच पडला होता. त्या फुलांचा नि निरनिराळ्या वनस्पतींचा किंचित उग्र पण शीतल गंध मनाला मोहिनी घालीत होता.'' (समरांगण पृ.६४)

शेतकरी-कष्टकरी काम संपल्यावर घरी जात असताना कामाचा शीण घालविण्यासाठी गीत गातानाही दिसतो. जणू हे श्रमिक गीतच अवतरले आहे. उदा.

'' शेतातलं काम संपलं की संध्याकाळी त्यांच्या बैलगाडीत बसून घरी जातांना सगळ्या कामाचा शीण नाहीसा झाल्यासारखा वाटे मला. त्याचे हौशा, सरदार हे बैल अगदी हरिणासारखं धावतं. अन् त्यातच हंबीरने गाण्याची झोड उठवावी. त्याचं तें नेहमीचं गाणं माझ्या कायमचं लक्षात राहिलय.

हौशाची ही सरदारची
माझी जोडी जणू हिऱ्याची
सरदारनं धावत यावे
हौशानं हे जू उचलावे
दौड बघावी मग गाडीची
क्षणात येते दिंड घराची

अन् या गाण्यात घर केव्हांस येई ते कळतसुध्दा नसे. (समरांगण पृ. ३७)

## ' समरांगण ' व ' उघड्या जगात ' कादंबरीत प्रतिबिंबित झालेले लोकसाहित्य

लोकसाहित्याची निर्मिती ही सामुहिक लोक मानसातून होत असते. अशी सामूहिक लोकमाणसाची खान ग्रामीण भागातील कृषिकेंद्रित लोकसमुदायात दिसते. कृषिकेंद्रित लोक

समुदायांच्या भावभावनांचा आविष्कार प्रामुख्याने ग्रामीण साहित्य घडवते. कृषिकेंद्रित लोकसमुदाय ही लोकसाहित्याची खऱ्या अर्थाने बोजभूमी मानावी लागेल.

सामूहिक लोकमानसातून परंपरेने चालत आलेले मौखिक साहित्य, लोकगीत, म्हणी, उखाणे आणि वाक्प्रचार यांची निर्मिती होत असते. लोकसाहित्याचे गद्य व पद्य असे जे मौखिक विभाग सांगितले आहेत. त्या विभागात प्रामुख्याने कथा-गीते, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे, शिवीशाप यांचा समावेश केला जातो. लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचे स्वच्छ प्रतिबिंब उमटलेले असते.

म. भा. भोसले यांच्या कांदबरीतील भाषा पध्दतीतून लोकजीवनाचे दर्शन घडते. या जीवनात मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकांमध्ये रुढ असणाऱ्या परंपरा, लोककला, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, अंधश्रध्दा समजूती, शिवीशाप इत्यादी या कादंबऱ्यातून आढळतात. अशा तऱ्हेचे लोकसाहित्याचे दर्शन हे म. भा. भोसलेंच्या कादंबरीच्या भाषेचे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

वरील वैशिष्ट्यांची उदाहरणे म. भा. भोसले यांच्या कादंबरीतून आली आहेत याचे स्वरुप लक्षात घेणे उचित ठरेल.

## लोकनाट्यातील लावणी

तमाशा हा एक लोककलाप्रकार आहे. हा लोक साहित्याचा एक महत्वाचा प्रयोगरूप कलाप्रकार आहे. खेड्यामध्ये श्रमपरिहारासाठी किंवा करमणुकीसाठी विविध उत्सव, प्रसंगाच्या निमित्ताने लोककला प्रकाराचे आयोजन केले जाते. या लोककला प्रकारातून सादर होणाऱ्या लावणी या लोकगीतातून प्रसंगाचे औचित्य असते. लावणी शरीर क्रियेशी, नृत्याशी निगडीत असते. प्राधान्याने तमाशा लोकनाट्य प्रकारामध्ये लावणीला महत्त्वाचे स्थान मिळालेले असते.

तमाशा हा लोकप्रकार ग्रामीण लोकजीवनाचा भाग आहे आणि हाच लोककला प्रकार म. भा. भोसले यांच्या भाषा शैलीतून व्यक्त होताना दिसते. तमाशा या लोकप्रकारामध्ये

सादर होणाऱ्या लावणीचा उल्लेख प्रसंगाच्या निमित्ताने ' उघडया जगात ' कादंबरीत आला आहे तो असा -

काही मन राग धरिला । हसूनि माझ्याबरोबर बोला ।
तुमच्या पायाची मी दासी । नका देऊबाई फासी ।
काय गुन्हा असा घडला (' उघड्या जगात' पृ. ९३)

किंवा

शिवू नका हो, दुरुनी मजशी बोला । दुरुनी मजशी बोला ।
माझा शलू निरीत लाल झा । (' उघड्या जगात ' पृ. ९५)

या रचनेतील शृंगार चित्रण कादंबरीच्या मुख्याशयाशी आणि विशेषतः चंद्रा आणि सखाच्या प्रेमाच्या आशयाशी निगडीत आहे.

## लोककथांची उपस्थिती

लोककथा हा लोक साहित्याचा एक महत्वाचा मौखिक प्रकार आहे. या लोककथेच्या माध्यमातून व्यक्तीची भावभावना, बोधपरता व्यक्त होण्यास मदत होते. म. भा. भोसले यांच्या कादंबरीमध्ये पात्रांचे भावाभिभाव व्यक्त करण्यासाठी निवेदन पध्दतीत लोककथांचा झालेला वापर हा त्या व्यक्ती चित्रणाची विशुध्द अभिव्यक्तीच म्हणावी लागेल. उदा. ' उघड्या जगात ' एक लोककथा येते ती अशी -

" एक धष्टपुष्ट बैल होता. सगळा जन्म धन्याची चाकरी करण्यात घालविला अन् त्या धन्यानही त्याची चारापाण्याची इतकी व्यवस्था ठेवली होती की त्या बैलाला वाटायचं सात जन्म या धन्याची चाकरी केली तरी त्याचे उपकार फिटायचे नाहीत. अखेर तो बैल म्हातारा झालं. ताटं चघळायला त्याच्या तोंडात दात राहिले नाहीत. त्याच्यानं काम होईना. मालकानं त्याला कसायला विकला. चरकावर चढताना त्या बैलाच्या तोंडून उद्‌गार निघाले, ' असल्या धन्याची राखरांगोळी होवो ! " (' उघड्या जगात ' पृ. १५६)

" एक कमरेएवढा उंच शिकारी कुत्रा होता. अहोरात्र जागून तो धन्याच्या वाड्याची राखण करी. चोरचिलटाला तर त्या वाड्याकडे फिरकण्याची छातीच नव्हती. पण एकदा

दरोडेखोरांवर देखील तो तुटून पडला अन् जिवाची पर्वा न करता त्यानं त्यांना पिटाळून लावलं. त्यात त्याला काही जखमा झाल्या. धन्यानं स्वत: त्याची काळजी घेतली. त्याला औषधपाणी केलं आणि नेहमी दुध-चपातीशिवाय त्याला खायला घातलं नाही. पुढं असंच एकदा तो दरोडेखोरांवर धावून गेला असता दरोडेखोरांनी त्याच्या पाठीवर लोखंडी गजाचे प्रहार केले अन् त्यात त्याचं कंबरडं मोडून तो कायमचा निकामी झाला. दुसऱ्या दिवशी धन्यानं त्याला हुसकावून लावला. फरफटत फरफटत बिचारा नदीकाठी जाऊन पडला आणि जिवंतपणीच गिधाडांनी त्याच्यावर हल्ला चढविला.'' (' उघड्या जगात ' पृ. १५७)

वरील दोन्ही कथातून नोकराने इमानदारीने सेवा करुनही त्यांच्या वाट्याला दु:खच येते हे सूचित केले आहे. तरी या कादंबरीतून या कथाद्वारे नाटकाचे भावविश्व व्यक्त करण्यास या कथांचे निवेदन शैली म्हणून वापर लेखकांनी केलेला आहे.

**म्हणी**

मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आढळणारा आणखी एक विशेष घटक म्हणजे म्हणी. म्हणीतून व्यक्त होणाऱ्या सत्याला अनुभवाचे अधिष्ठान असते. ग्रामीण भागातील लोक आपल्या बोलीभाषेत म्हणींचा वापर करीत असलेले दिसतात. दुर्गाबाई सांगतात, '' म्हणी अनुभवाच्या खाणी आहेत. ''[३] या मताप्रमाणे ग्रामीण माणूस आपले अनुभव कधी कधी म्हणीद्वारे व्यक्त करताना दिसतो. म. भा. भोसले यांच्या कादंबऱ्यातूनही म्हणींचा वापर झालेला दिसतो तो पुढीलप्रमाणे -

**समरांगण** - मुळाच्या पोटी केरसुणीचा जन्म. ( पृ.११)

कावळ्याच्या शापाने ढापी थोडीच मोडते. (पृ.१३)

खाण तशी माती. (पृ. १६)

**उघड्या जगात** - देखल्या देवाला दंडवत. (पृ. १४८)

अशा प्रकारच्या म्हणींचा वापर लेखकांनी संवादाच्या भाषेतून वापर केलेला आढळतो.

## वाक्प्रचार

लोकजीवनातील अनुभवातून वाक्प्रचार विकसित होत असतात. त्यांना त्यानुसार अर्थ-सौंदर्य लाभत असते. हे वाक्प्रचार रुढीने सामुहिकरित्या मान्य केलेले असतात. त्यामुळे तो वाक्प्रचार विशिष्ट अर्थाने समृध्द असतो व म्हणून त्याचा जसाच्या तसा वापर परंपरेतून चालू असतो. मोजक्या शब्दात गहण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्द समुदाय म्हणजे वाक्प्रचार वापर ग्रामीण लोकजीवनात जास्त दिसतो. यामुळे म. भा. भोसले यांच्या भाषा शैलीतून या वाक्प्रचाराचा वापर दिसतो. याची काही ठळक उदाहरणे पुढीलप्रमाणे -

**' <u>समरांगण</u> '** - बाँब गोळ्याचा वर्षाव होणे, रक्ताचं पाणी करणे, अंगावर काटा उभा राहणे, कीव येणे, उपमर्द झाल्यासारखे वाटणे, अंगाचा डोंब होणे, अंग टाकणे, मनाची तळमळ होणे, आतताईपणा करणे, अंगाचा तिळपापड होणे, मुग्ध होणे, आगीचा डोंब उसळणे, आशा दुरावत जाणे, आक्रोश करणे, जीवाचे मोल मोजणी, शिरस्ता असणे, हुज्जत घालणे, हर्ष होणे, शेफारुन ठेवणे, कानउघडणी करणे, शीण नाहीसा होणे, पासंगाला न पुरणे, जीव पिळवटून निघणे, चैन करणे, निश्चय करणे, निर्धार करणे, तिळतिळ तुटणे, गयावया करणे, जीवावर येणे, धुळीला मिळविणे, निकाल लावणे, डोळ्यास डोळा न लागणे, काळीज हादरुन जाणे, मन विषण्ण होणे, क्षणाची फुरसत नसणे, अभिमान वाटणे, मन उद्विग्न होणे, मस्तक भडकणे, पसार होणे, प्रहार होणे, धुमसत राहणे, बावचळून जाणे, मन खंबीर करणे, मनाची चलबिचल होणे, हातपाय गळणे, धरणी दुंभगणे, हातपाय लुळे पडणे, डोळ्यांना अंधारी येणे, आग पाखडणे, बोभाटा होण, तिष्ठत बसणे, पोटात धस्स होणे, बेफाम होणे, परागंदा होणे, मन सुन्न होणे, ह्रदय व्याकूळ होणे, सत्याग्रह करणे, हिसकावून घेणे, गळा दाटून घेणे, अंगाला घाम सुटणे, जीव कासावीस होणे, त्वेष चढणे, मस्तक बधीर होणे, विकोपाला जाणे, दुःखाला पारावार न राहणे, आकाशपाताळ एक करणे, नवल वाटणे, गहिवरुन येणे, धाय मोकलून रडणे, भांबावून जाणे, भडभडून येणे.

**' उघड्या जगातं '** - निकड न लावणे, घासाघीस करणे, ह्रदय पिळवटून जाणे, नवल वाटणे, तारांबळ उठणे, डाव धरणे, हातपाय गळणे, थरकाप होणे, उतावीळ होणे, शिव्यांची

लाखोली वाहणे, काळीत तिळतिळ तुटणे, अंगावर मास चढणे, नरडीचा घोट घेणे, गर्क होणे, मनाचा धडा करणे, तोंडात शेण घालणे, हाय खाणे, त्रागा करणे, खडसावून सांगणे, जीव बेचैन होण, हुज्जत घालणे, अवसानघात होणे, काहूर माजणे, जीव तळमळणे, लगट करणे, अंगाचे पाणी होणे, हृदय व्याकूळ होणे, चेहरा काळवंडणे, विस्मय वाटणे, विसर पडणे, शाश्वती नसणे, किर्ती मिळविणे, स्फूर्ती येणे, तर्ककुतर्क करणे, कुतुहल वाटणे, स्तिमित होणे, पारखा होणे, थैमान घालणे, मन विव्हल होणे, शरीराची काहिली होणे, शेष धरणे, गळा दाटून येणे, काटा काढणे, भाडभीड न ठेवणे, आकांडतांडव करणे, हातपाय गळणे, अंगावर शहारे येणे, लगाम घालणे, हात शिवशिवणे, अंत:करण विदीर्ण होणे.

अशाप्रकारे वाक्प्रचारांचा वापर म. भा. भोसले यांनी आपल्या कादंबऱ्यातून सढळपणे केला आहे.

**शिव्याशाप**

शिवी म्हणजे संतापदग्ध शाप. ग्रामीण लोकसमूहात शिव्या ओव्यांसारख्या येतात. तो एक सहजी भाषाविष्कार वाटतो. शिवी निषिध्द आहे. ही गोष्ट नागर संवेदनशीलते पुरती मर्यादित परंतु शिवी आणि ग्रामजीवन याचे एक अतूट नाते असते असे हे साहित्य वाचताना वाटून जाते. म. भा. भोसले यांच्या कादंबरीतून या शिव्यांचा आढळ अतिरिक्त नसला तरी तो वाचकास वाचावयास मिळतो. उदाहरण पुढीलप्रमाणे -

मेल्या, तुला पटकीचा तडाखा बसला, त्वांड काळं कर, भाड्या, मांग, बाजरबसती, कुटाळ, कंपुच्याच, हुमदांडगेपणा, रांड, मुर्दाड.

ग्रामीण भागात या शिव्यांचा वापर सहज बोलण्यातून एक वेगळा परिस्थितीजन्य भाव व्यक्त करण्यासाठी होताना दिसतो. या शिवी-शापांचा अर्थ पूर्णपणे ग्रामीण माणसांना माहीत असतोच असे नाही. अशा शिवी-शापांचा उल्लेख म. भा. भोसले यांच्या कादंबरीतून आले असल्याने त्याच्या भाषेचे ते एक वैशिष्ट्य ठरते.

## खांडेकर रुपकथेची झलक

म. भा. भोसले यांच्यावर खांडेकरांच्या भाषाशैलीचा प्रभाव असल्याने त्यांच्याही कादंबरीत खारेकराच्या प्रमाणे रुपक कथांचा वापर केलेला दिसतो. या रुपक कथेचा वापर (लेखकानी आपल्या कादंबरीतून केलेला) केला तरी तो पात्राची भावाभिव्यक्ती व कथाशय पुढे नेण्याच्या दृष्टीने उपयुक्त अशा भाषा शैलीचाच वापर केल्यासारखा वाटते. ती रुपककथा पुढीलप्रमाणे -

**' सुंदर संगीत '**

वाऱ्याच्या मंद झुळकेवर तो ऊसांचा सगळा फड मोठ्या आनंदानं डुलत होता. एक आठवडा होत आला. त्या ऊसांना पाण्याचा थेंबसुध्दा मिळाला नव्हता. अन् दुपारच्या उन्हाने तर त्यांचा जीव कासावीस व्हायचा नुसता. पण ती कटू आठवण ते विसरुन गेले अन् चंद्रिकेत न्हाऊन निघताना त्यांना क्षणभर का होईना समाधान वाटले. इतक्यात कुठूनसे सुंदर आलाप त्यांच्या कानावर आदळले.

' कर्रर्र, कर्रर्र, कुर्र, कुर्र.......! '

किती सुंदर संगीत ! ते ऊस अधिकच डोलू लागले. जणू त्या रागदारी संगीतात ताल धरायचं काम त्यांच्याकडंच होतं ! इतक्यात दोन चार गडी हातात कुऱ्हाडी घेऊन त्या फडांत आले. ऊसांनी मोठ्या आतुरतेने विचारले, ' कोण गातंय तें ? '

' चरक ! '

' किती छान गातोय. खरा कलावान. '

थोड्या वेळाने ते संगीत बंद झालं. ऊस त्यात मुग्ध झाले. त्यांना राहवेना. ते पुन्हा म्हणाले, ' बंद झालं वाटतं गाणं ! '

' विसावा घेत असेल तो. ' गड्यांनी सांगितले.

' आता सुरुवात केंव्हा करणार ? '

' आम्ही गेल्याबरोबर. '

गड्यांनी त्या ऊसाचे कवळे घेतले. अन् ते चालू लागले. आता आपलं काय होणार, म्हणून ऊसांना मोठी काळजी पडली. त्यांनी भीत भीत विचारले, ' कुणीकडं नेता आम्हांला ? '

' ते संगीत ऐकायला ! '

' स्वर्गातच चाललो आहोत की मग. ' ऊसाचं मन आनंद सागरांत पोहू लागलं नुसतं.

ते ऊस ठिकाणावर पोचले. अन् लगेच संगीताला सुरवात झाली. कसलं संगीत ते? चरकरुपी यमयातनांत पिळून निघणाऱ्या त्यांच्याच भाऊबंदाचे करुण चित्कार होते ते ! धडकीच भरली ह्या नव्या ऊसांच्या हृदयांत .

कानांत बोट घातली त्यांनी. पण ते भयंकर संगीत ऐकावं अन् गावही लागलं त्यांना !' (समरांगण पृ. १००)

दलित वर्गाच्या अज्ञान दाखवून त्या कादंबरीतील लोकांमध्ये असलेले अज्ञानच व्यक्त करावयाचे आहे.

**नागर - ग्रामीण समिश्र भाषाशैली**

विचार व भावनाभिव्यक्तीसाठी माणूस भाषेचा वापर करतो. भाषा हे भावना आणि विचार व्यक्त करण्याचे साधन आहे. भाषा ही जशी विचाराचे साधन आहे तशीच ती साहित्याचे माध्यमही आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे भाषा ही एक सामाजिक संस्थाही आहे. सामाजिक व्यवहार भाषेतूनच शक्य होतात. तरीही व्यवहाराच्या सोयीसाठीच नागर भाषा आणि ग्रामीण भाषा असे दोन भेद भाषेमध्ये रुढ असलेले दिसतात. समाजजीवनात एकाचवेळी नागर भाषा आणि ग्रामीण भाषा व्यवहारात रुढ असते. तसे नसेल तर लोकव्यवहाराला मोकळीक राहणार नाही. समिश्र भाषेचा वापर करुन अशा प्रकारची मोकळीकता मिळण्यासाठीच म. भा. भोसले यांनी नागर आणि ग्रामीण याचा संमिश्र वापर कादंबरीत केलेला दिसतो.

उदाहरणार्थ -

आपल्या एकूलत्या एका पोरीचा बाजार मांडण्याची कल्पनाच त्याच्या मनाला शिवत नव्हती. हुंडा न देता नी न घेता त्याला चांगलं स्थळ हवं होतं. पण सध्याच्या जगात तेच जमणं अगदी अशक्य होतं.

ह्या विचारानं वैतागल्यासारखा होऊन तो आपल्या बायकोस म्हणाला, ' खरंच घेऊ या हौशाचं चारशे रुपये. मजी करज तरी फिटंल, आनी चार एकर जमीन तरी मोकळी हुईल!'

तेत्याच्या बायकोनं पुरतं ऐकून घेतलं न घेतलं तोच तो पुन्हा म्हणाला, ' छे, छे ! असं आपुन कधीच करुनी ! ' (' उघड्या जगात ' पृ. १७)

वरील उदाहरणामध्ये लेखकांनी निवेदनासाठी नागर भाषेचा वापर केला आहे आणि पात्राचा विचार व्यक्त करण्यास ग्रामीण भाषेचा वापर केलेला दिसतो. पत्राचा विचार व्यक्त करण्यास वापरलेली भाषाशैली उपयुक्त ठरते.

## कादंबऱ्यातील ग्रामीण वैशिष्ट्यपूर्ण शब्दांची उपस्थिती

ग्रामीण जीवनात तेथील लोकांची स्वत:चीअशी बोली भाषा असते. त्या भाषेतूनच तेथील जीवनधर्म, जीवनशैली समजत असते. त्यामुळे अस्सल ग्रामीण साहित्यात ग्रामीण बोलीभाषाही आढळतेच. लेखकाने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल तर तो ग्रामीण बोलीचा कौशल्याने वापर करु शकतो. स्थानिक बोली तिथल्या जीवनधर्मातून निपजलेल्या असतात. याच बोली ग्रामीण भाषा या नावानेही ओळखले जाते. अशा ग्रामीण जीवनधर्मातून निपजलेल्या बोलीभाषेतून तेथील व्यवसाय वृत्ती आणि प्रदेश ही वैशिष्ट्येही व्यक्त होताना दिसतात. म. भा. भोसले यांच्या कादंबऱ्यात अशा ग्रामीण वैशिष्टयांनी युक्त अशा शब्दांचा वापर झालेले आढळतात.

**समरांगण -**

बरकत - भरभराट (पृ.१२), गावंदरी - गावाजवळचे शेत (पृ.१४), बिऱ्हाड - कुटुंब(पृ.१५), आच - आग, विस्तव (पृ.२१), निपज- उगवणे (पृ.२७), हाथणी -धान्य निवडायची

केरसुणी (पृ. ३६), आरा- पिकाच्या दोन ओळीतील अंतर (पृ. ३६), धांदोटी-फाडलेले कापड (पृ.३७), रापण- मासे धरण्यासाठी रात्री टाकलेली जाळी (पृ.४५), मोकार -मऊ (पृ.६४), कासंडी - लहान गोल भांडे (पृ.९८), पेव -धान्य साठवायचे जमिनीतील गोदाम (पृ.१०४), बेरड -गुन्हेगार जमात (पृ.१०७), घात येणे - पेरणी योग्य मातीची स्थिती (पृ.१५३), सारा -शेतीचा कर (पृ.१५३)

**उघडया जगात -**

हरळी- तण (पृ. १५), कडुंस- सायंकाळनंतरची वेळ (पृ.१६),काटवट -परात (पृ. १८), वावटळ- वादळ (पृ.१९), ढाळ लागणे - जुलाब लागणे (पृ.२४), औंदा-यावर्षी (पृ.२७), तांडा- समुदाय (पृ.२९), प्वांर -मुलगा (पृ.३९), ढुशी देणे -टक्कर देणे (पृ.३९), ढेलजेत -सोपा (पृ.४०), मुका-चुंबन (पृ.४२), किरळ- जोंधळा कापल्यावर (पृ.४४), बरगा -छपराचा आतील लाकडी आधार (पृ.४८), वस्तरा-नाव्ह्याचे हत्यार (पृ.४८), पान लागणे - साप चावणे (पृ.५४), बिनसुदी - बेशुध्दी (पृ.५५), इकारी-विषारी (पृ.५५), रोकड - पैसा (पृ.५७), हुज्जत - तंडवाद (पृ.५९), कुळवणी - जमीन मशागत करणे (नांगरणीनंतर) (पृ.५९), रांजण - पाणी साठविण्याचा मातीचा मोठा घडा (पृ.६१), सापत्या- बैल जुंपायचे साधन (पृ.६१), चंची - पान-सुपारी ठेवायची पिशवी (पृ.७१), कोटरीत - घरट्यात (पृ.७३), डिरकू लागणे - बैलाचे ओरडणे (पृ.९०), भुस्काट - कोरडा चारा (पृ.१०६), छापी - चिलमीला गुंडाळायचे कापड (पृ.१११), आडशिरी - धान्य मोजण्याचे माप (पृ.१४३), सड - जोंधळे कापून उरलेला जमिनीतला भाग (पृ.१४९), बाजलं - चारपाई (पृ.१५५), दस्त - स्टँप पेपर (पृ. १९१)

अशा प्रकारे म. भा. भोसले यांच्या कादंबरीतील ग्रामीण शब्दांचे स्वरुप आहे. यातून तेथील व्यवसाय प्रदेश वैशिष्ट्यांचा बोध होतो. तसेच ग्रामीण कादंबरीतील संवाद निवेदन पध्दतीमध्ये बोली अपरिहार्य असल्याने ग्रामीण शब्दांची रेलचेल आढळून येणे स्वाभाविकच म्हणावे लागते.

## लेखनशैलीची वैशिष्ट्ये

१) म. भा. भोसले यांनी लेखन केलेल्या कादंबऱ्यातील घटना, प्रसंग हे प्रत्यक्ष ग्रामीण जीवनातले आहेत. म्हणून ते वास्तवरुपी वाटतात. लेखकाने समाजाची संपूर्ण परिस्थिती जवळून पाहिली आहे. ती अनुभवली आहे व ती व्यक्तही केलेली आहे. सर्वसाधारण ग्रामीण माणसांवर कसा अन्याय होतो, तो कसा पिळला जातो, याचबरोबर या अन्यायाला शासन व त्याचे परिमार्जन लेखकाने लेखणीतून केलेले दिसते.

२) भोसले यांच्या लेखणीवर खांडेकरांचा प्रभाव होता. तरीही तो पूर्ण अनुकरणाचा नसून विचाराचा होता हे या कादंबरीतील लेखनीतून जाणवते. कादंबऱ्यामधून भोसले यांनी आपल्या लेखन कौशल्यातून खेड्याचे हुबेहुब जीवन साकरलेले आहे. तसेच खेड्यातील माणसांचे परस्पर संबंध, प्रसंगानुसार संघर्ष, माणुसकी, माणसाचे राहणीमान, परंपरा, श्रध्दा, सण, उत्सव, परंपरा हे सारे त्यांच्या कादंबऱ्यात चित्रित झाले आहे. इतकेच नव्हे तर या चित्रणात ‘ स्वत: जगण्यापेक्षा दुसऱ्याला जगविण्यात माणूसकी आहे ’ ही विचारधारा लेखनातून स्पष्ट केली आहे.

३) ग्रामसंस्कृतीला पोषक असणारे शेतकरी व बलुतेदार, शेती उपयोगी प्राणी यांचे विश्वही आपल्या लेखनीद्वारे कादंबऱ्यामध्ये यशस्वीरित्या साकारलेल्या दिसतात.

४) भोसले यांनी कादंबऱ्यात सुष्ट प्रवृत्ती विरुध्द दुष्ट प्रवृत्ती यांचा संघर्ष कादंबऱ्यातून उठावदार रितीने आली असून यामध्ये सत्त प्रवृत्तीचाच विजय लेखन शैलीतून उठावदार पध्दतीने मांडतात.

५) ग्रामीण लेखक म्हणून लिहित असताना ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्न शेतकरी, कुटुंबव्यवस्था, तिचे महत्व, त्याचे कौटुंबिक प्रेम, हेवेदावे, समाजप्रवृत्ती इत्यादी चित्रणातून तत्कालीन वास्तव ग्रामीण जीवन अनेक अंगप्रत्यंगाद्वारे लेखनाविष्कृत करतात.

६) म. भा. भोसले हे आपल्या लेखनातून ग्रामीणतेचा बाज जपतात. ग्रामजीवनातील अनेक प्रश्न बोलके करुन तेथील ग्रामीण व्यक्तीरेखा आपल गुणदोषासहित लेखणीतून साकारतात.

७) भोसले यांच्या लिखाणात एक प्रकारचा ग्रामीण जीवनाचा साचेबध्दपणा जाणवतो. त्यांनी ग्रामीण भागातील सामान्या माणसासाठीच आपल्या लेखनाचा उपयोग बहुजन हितायसाठी केला आहे. पैसा अगर किर्ती मिळविण्यासाठी केलेला नाही.

८) भोसले यांची निवेदन पध्दती तृतीय पुरूषी असून भाषा सरळ स्वरुपाची आहे. त्यांच्या कादंबऱ्या कलादृष्ट्या विशिष्ट बिंदूवर संपत असेल तर ते तेथेच थांबलेले आहेत. म्हणजेच कादंबऱ्याचा शेवट कलादृष्ट्या योग्य आहे हे त्यांच्या लेखनातून जाणवते.

९) कादंबऱ्यातील कथानक, कथानकाचे नाट्य आणि नाट्यमय जीवनाला संवादी बनविण्यासाठी ग्रामीण व नागर भाषेचा संमिश्र वापर केलेला आढळतो.

१०) भोसले यांच्या लेखनासंबंधी सांगताना श्री. के. क्षीरसागर ' गारसावली ' च्या प्रस्तावनेत म्हणतात, " भोसले हे आजकालच्या ग्रामीण जीवनाचे जागृत प्रेक्षक व चित्रकार आहेत. त्यांचे डोळे उघडे आहेत, मन जागृत आहे व भाषा मळलेली आहे. त्यांच्या लिखानात आजच्या राजकीय, सामाकि आणि गृह्य झगडयाचे उद्वेधक प्रतिध्वनी आहेत." [३]

११) तर ' बेळगाव चिकित्सक ' मध्ये मधुकर गुर्जर म्हणतात, " म. भा. भोसले यांची लेखणी ग्रामीण जीवन रंगविण्यात चांगली तरबेज झालेली दिसते. त्यांच्या लेखणीचा कल्पना विलास ही दांडगा असतो. लघुकथेच्या अंतरंगात ते अधूनमधून अलंकार, विनोद, सुंदर वाक्ये यांची पेरणी एखादया सराईताप्रमाणे करतात." [४]

१२) एक शिक्षक आपल्या लेखणीद्वारे ग्रामीण जीवनाला समृध्दतेचा व सांस्कृतिकतेचा एक समृध्द वारसा कसा देतात. त्याचे प्रत्यंतर भोसले गुरुजींच्या या दोन कादंबरी लेखनातून प्रत्ययास येते.

१३) लेखनात नुसती सहानुभूती नाही, स्वानुभती आहे. या स्वानुभूतीत दार्दीपणा नसेल, दाहकता नसेल, द्रष्टेपणा नसेल, पण तिच्यात जिवंतपणा आहे. त्यामुळेच त्यांच्या चित्रणात आकर्षकता आली आहे. उदा. ' उघड्या जगात ' पिराजी गंजीला आग लावण्याचा प्रसंग.

१४) गुरुजींनी आपल्या लेखणीतून समाज, संस्कृती आणि समाज मन जपण्याचा प्रयत्न अत्यंत तळमळीने केला.

एकंदरीत म. भा. भोसले यांच्या कादंबरीतून एका विशिष्ट भूभागातील ग्रामजीवन धनगांव, भिलवडी परिसरातील शेतकरी, कष्टकरी माणसं, त्यांनी त्यांच्या वैशिष्ट्यासह साहित्यात आणली.

सावकारी पाशात अडकलेला बलुतेदार, गरीब-श्रीमंतातील दरी, सावकारी शोषण, पिळवणूक, लुबाडणूक इत्यादी गोष्टी कादंबऱ्यातून दिग्दर्शित केल्या. खरे पाहता कादंबरीचा शेवट हा सतप्रवृत्तीचा विजय दाखविल्याने त्या कादंबऱ्यांना वाचकांनी भरभरुन दाद दिली. त्यामुळेच ' उघड्या जगात ' या कादंबरीवर ' जीवाचा सखा ' हा चित्रपट काढण्यात आला. एकूणच म. भा. भोसले हे एक उत्तम ग्रामीण लेखक असून त्यांनी आपल्या लेखन कार्याद्वारे सुरुवातीच्या काळात ग्रामीण साहित्याचा प्रवाह कमी अधिक प्रमाणात का होईना समृध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तरीही एक कादंबरी लेखक म्हणून म. भा. भोसले यांच्या लेखनात काही उणीवा आढळता. त्याचा नम्रपणे उल्लेख इथे करणे गरजेचे आहे. भाषा तंत्र आविष्कार पध्दती इत्यादी अनेक गोष्टीत फडके-खांडेकरांची छाया त्यांच्या लेखनावर आहे. क्षीरसागरसारख्या त्यांच्या प्रस्तावनाकाराने ' भोसले शेतकऱ्यांचे मित्र वाटतात पण शेतकरी वाटत नाहीत. कदाचित हा फडके - खांडेकरांच्या फाजील सहवासाचाही परिणाम असू शकेल.

## सारांश

१) कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' व ' उघड्या जगात ' या दोन्ही कादंबऱ्यातील निवेदनपध्दती तृतीय पुरुषी पध्दतीची दिसते.

२) तसेच निवेदन पध्दती लक्षात घेता कादंबऱ्यात ठाई ठाई अंलकृत, बोधपर व सुभाषित प्रधान भाषाशैलीचा वापर केलेला दिसतो.

३) लेखकाच्या लेखनावर खांडेकरांचा प्रभाव असला तरीही तो पूर्ण अनुकरणाचा नसून विचाराचा होता हे लेखणीतून जाणवते. यामुळेच (स्वत: जगण्यापेक्षा दुसऱ्याला जगविण्यातच माणूसकी आहे) ग्रामीण जीवन हे जगण्यासाठी नसते ते जगविण्यासाठी असते ही विचारधारा त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते.

४) कादंबऱ्यात कृषि संस्कृती घटक, निसर्ग, पाऊस, कृषिकर्म यांचे वर्णन ग्रामीण पार्श्वभूमी उभी करण्यास आवश्यक वातावरण निर्मिती त्यांच्या लेखनशैलीतून उभी केलेली आढळते.

५) ग्रामीण लोकजीवनातील भाषेचा अविभाज्य अंग असलेले म्हणजे काव्य, म्हणी, वाक्प्रचार, शिवीशाप यांचा वापर म. भा. भोसले यांनी आपल्या कादंबऱ्यात प्रसंग चित्रण उभे करण्यास केलेले आहे. लोकसाहित्यात लोकसंस्कृतीचे स्वच्छ प्रतिबिंब उमटते. त्यामुळे ग्रामीण लोकजीवनातून येणारे हे भाषाविशेष लोकसाहित्याचा भाग आहे. हेच म. भा. भोसले यांच्या लेखशैलीचे विशेष आहे.

६) म. भा. भोसले यांच्या भाषा शैलीचा विचार करता नागर, ग्रामीण भाषेचा संमिश्र वापर करुन यथार्थ अशी अभिव्यक्ती आपल्या लेखणीतून साधली आहे. याचबरोबर ग्रामीण वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा परिचयही त्यांच्या लेखणीतून झाला आहे.

७) वरील सर्व लेखन शैलीचा विचार वैशिष्ट्यामध्ये करुन भाषा शैलीचा परिपूर्णतेने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु भाषा तंत्रात आविष्कार पध्दती वर

फडके-खांडेकर छाया त्यांच्या लेखनावर असल्याने काही वेळा त्यांचा अतिरेक वापर जाणवतो. हा त्यांच्या लेखन शैलीचा दोष मानावा लागेल.

कादंबरीकार म. भा. भोसले यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये यांचा विचार केल्यानंतर आत्तापर्यंत ' ग्रामीण साहित्य आणि कादंबरीकार म. भा. भोसले ', ' ग्रामीण संस्कृती ' आणि ' म. भा. भोसले यांचे कथात्मक साहित्य ', म. भा. भोसले यांच्या ' समरांगण ' व ' उघड्या जगात ' या कादंबऱ्यातील ग्रामीण संस्कृतीचे चित्रण विशेष असा विविध अंगांनी अभ्यास करताना जे निकष हाती आले ते आता उपसंहार या पुढील प्रकरणात नोंदवायचे आहेत.

## संदर्भ

१. यादव आनंद : ' ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या' मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे द्वि. भा. १९८४ पृ. १-८६

२. भोसले. म. भा. : ' समरांगण ' (कादंबरी) ग्रामीण प्रकाशन, धनगांव द्वि. आ. १९६०, प्रस्तावना पृ. क्र. ६.

३. भागवत दुर्गा : लोकसाहित्याची रुपरेषा वरदा बुक्स, पुणे, द्वि. आ. १९७७ पृ. क्र. २७६